**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया अंक ०८ | बुधवार,दि.२७ जानेवारी २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

# दिल्लीच्या रस्त्यांवर हिंसा करणारे घुसखोर; ४० शेतकरी संघटनांचा दावा



**नई दिल्ली (वृत्तसंस्था) :** कृषी कायद्यांना विरोध करण्यासाठी दिल्लीमध्ये प्रजासत्ताकदिनी आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी ट्रॅक्टर रॅलीला अनेक ठिकाणी हिंसक वळण मिळाल्याचं चित्र पहायला मिळालं. मात्र या हिंसेचा संयुक्त किसान मोर्चाने निषेध केला आहे. मागील दोन महिन्यांपासून सुरु असणाऱ्या शेतकरी आंदोलनाअंतर्गत ट्रॅक्टर परेड काढण्यात आली होती. यामध्ये दिल्लीतील आयटीओ, लाल किस्सा, नांगलोई, सिंघू, टिकारी बॉर्डर आणि इतर ठिकाणी शेतकरी आंदोलकांनी हिंसा केल्यानंतर संयुक्त किसान मोर्चाने अधिकृत भूमिका जाहीर केली आहे.

संयुक्त किसान मोर्चाने जारी केलेल्या वक्तव्यामध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ट्रॅक्टर रॅलीला शेतकऱ्यांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. मात्र याच आंदोलनामध्ये झालेल्या हिंसक घटनांचा विरोध करत आहे. या घटनांसाठी जे लोक जबाबदार आहेत त्यांचा संयुक्त किसान मोर्चाशी काहीही संबंध नसल्याचेही शेतकरी नेत्यांनी स्पष्ट केल्याचं न्यूज १८ ने दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे.

## दिल्लीतील ट्रॅक्टर परेडदरम्यानच्या हिंसाचाराला भाजपाचे पोलिसचं जबाबदार

दिल्लीत ट्रॅक्टर परेड दरम्यान झालेल्या हिंसाचाराला भाजपाचे पोलिसचं जबाबदार असल्याचा आरोप शेतकरी नेते अशोक ढवळे यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी हिंसा केलेली नाही, जी काही हिंसा झाली ती पोलिसांनी केली आहे. ती सुद्धा भाजपाच्या सरकारच्या सांगण्यावरुन झालेली आहे, असंही ढवळे यांनी म्हटलं आहे.

शेतकरी आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या ४० शेतकरी संघटनांच्या संयुक्त किसान मोर्चाने घडलेल्या हिंसेसंदर्भातही भाष्य केलं आहे. आमच्या सर्व प्रयत्नानंतरही काही संघटना आणि व्यक्तींनी नियोजित मार्गाचे आणि नियमांचे उल्लंघन केलं आणि त्यांनी निंदनीय कृत्य केली. असामाजिक तत्वांनी शांततापूर्ण आंदोलनामध्ये घुसखोरी केली. आम्ही नेहमीच हे आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्याचा ठरवलं आहे. शांतता आमची सर्वात मोठी ताकद आहे. कोणत्याही प्रकारच्या नियमांचे उल्लंघन करुन आंदोलनाला नुकसान पोहचू द्यायचे नाही असा आमचा हेतू आहे.

शेतकरी नेत्यांनी जारी केलेल्या वक्तव्यामध्ये सहा महिन्यांपासून शेतकऱ्यांचा हा संघर्ष सुरु असल्याचं म्हटलं आहे. मागील दोन महिन्यांहून अधिक काळापासून शेतकरी दिल्लीच्या सीमांवर आंदोलन करत असून त्यामुळेच आजस-ारखी परिस्थिती निर्माण झालीय. नियमांचे उल्लंघन करुन हिंसा करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेचा आमच्याशी काहीही संबंध नाहीय. सर्वांनी ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणे आणि ध्येयाने आंदोलन करण्याचं आम्ही सर्व शेतकऱ्यांना आवाहन करतो. कोणत्याही प्रकारची हिंसक घटना, राष्ट्रीय स्मारकांना पोहचवलेली हानी आणि इतर गोष्टींचा आमच्या मोर्चाशी काहीही संबंध नाही. असं करणाऱ्यांपासून मोर्चातील शेतकऱ्यांनी दूर रहावे असंही संयुक्त किसान मोर्चाने म्हटलं आहे.

### अमित शाहची अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक

दिल्लीमध्ये सुरु असलेल्या शेतकरी आंदोलनाला हिंसक वळण लागलं असून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह गृहमंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेत आहेत. गरज पडली, तर तैनातीसाठी अतिरिक्त तुकडया सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

संयुक्त किसान मोर्चाने आज नक्की काय काय घडलं यासंदर्भातील माहिती आम्ही घेत आहोत असंही म्हटलं आहे. यासंदर्भात लवकरच संपूर्ण चित्र स्पष्ट होईल अशी अपेक्षाही मोर्चाने व्यक्त केली आहे. काही ठिकाणी घडलेली हिंसा वगळता नियोजित पद्धतीने आंदोलन सुरु असल्याचेही संयुक्त किसान मोर्चाने म्हटलं आहे.

# बेईमानीने आलेले असंवेदनशील सरकार-फडणवीसांची टिका



**भंडारा:-** राज्यातील आघाडी सरकार हे बेईमानीने आ-लेले सरकार आहे. या सरकारच्या संवेदना संपल्या आहेत. धान खरेदी, पूर परिस्थिती, वीजबिल वसुली व अलीकडेच सामान्य रुग्णालयात घडलेल्या अग्निकांडात या सरकारची असंवेदनशीलता दिसून आली. अशा सरकारला धडा शिकविण्यासाठी व शेवटच्या माणसापर्यंत न्याय मिळण्यासाठी संघर्ष थांबणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्यम-ंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने सोमवारी भंडारा येथे शेतकरी तथा सर्वसामान्यांच्या विविध मागण्यांसाठी धडक मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खा. सुनील मेंढे, आ. डॉ. परिणय फुके, माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजप जिल्हाध्यक्ष शिवराम गिऱ्हेपुंजे, माजी आमदार चरण वाघमारे, बाळा काशिवार, अँड. रामचंद्र अवसरे, संजय पुराम, माजी खासदार शिशुपाल पटले, मो. तारीक कुरैशी, संजय भेंडे, उपेंद्र कोठेकर, महिला अध्यक्ष खापरे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

सदर मोर्चा शास्त्री चौकातील साखरकर सभागृहातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निघाला. जिल्हाधिकारी कार्यालय चौकात या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. या सभेला संबोधित करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमच्या सरकारमध्ये जिल्ह्यातील धान खरेदी प्रक्रिया कधीही खंडीत झाली नव्हती. चुकारे नियमित झाले. परंतु, आज धान खर-ेदीची व्यवस्थाच उद्धवस्त झाली आहे. धान खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे मिलर्सनी संप पुकारला आहे. या धोरणामुळे आजही मोठया प्रमाणात धान खरेदी शिल्लक असून शेतकऱ्यांना चुकाऱ्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

पूर्व विदर्भात ऑगस्ट २०२० मध्ये आलेल्या महापुरानंतर मोठया प्रमाणात नुकसान झाले. परंतु, मुख्यमंत्र्यांनी पूर्व विदर्भासाठी फक्त १६ कोटींची मदत देऊन बोळवण केली. जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे साडेबारा कोटी रुपये देणे आहेत. सरकारने हे पैसे देण्याचे आश्वासन दिले असताना अद्याप शेतकऱ्यांना एक रुपयाचीही मदत मिळाली नाही.

थकीत वीज बिल वसूलीबाबत देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारवर जोरदार टिका केली. ते म्हणाले, उर्जामंत्र्यांनी १०० युनिटपर्यंत वीज बिल माफीची घोषणा केली होती. त्यानंतर वीज बिलात सुट देऊ, असे जाहीर केले होते आणि आता वीज वापरली तर बिल भरा, असे सांगत आहेत. हा राज्य सरकारचा जन-तेवर अन्याय आहे. वीज बिलात सुट देण्यासाठी सरकारला १२०० कोटी रुपये लागतात. परंतु, सरकारला ते शक्य होत नाही आणि मुंबई, पुण्याच्या बिल्डरांना पाच हजार कोटींची सुट दिली जाते. तेव्हा सरकारला तिजोरी आठवली नाही का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात ९ जानेवारी रोजी घडलेल्या अग्निकांडात १० नवजात बाळांचा मृत्यू झाला. या रुग्णालयातील फायर सेफ्टीचा प्रस्ताव सहा महिने टेबलावर पडून होता. हा प्रस्ताव तात्काळ मंजूर झाला असता तर ही वेळ आली नसती. परंतु, मुंबईच्या महालात राहणाऱ्यांना गरीबांच्या मुलांचे दु:ख कळणार नाही. इतकी गंभीर घटना घडूनही निलंबित केलेल्या जिल्हा शल्यचिकीत्सकांना सन्मानाने वर्धा जिल्हा रुग्णालयात रूजू करुन घेण्यात आले. या घटनेला दोषी असलेल्यांवर गुन्हे अद्याप दाखल करण्यात आले नाहीत. या सरकारला पैशांपलिकडे काही दिसत नाही, अशी टिकाही देवेंद्र फडणवीस यांनी केली.

या सभेत खा. सुनील मेंढे, आ. परिणय फुके, माजी उर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आमदार चरण वाघमारे, बाळा काशिवार, अँड. रामचंद्र अवसरे, माजी खासदार शिशुपाल पटले यांनीही संबोधित केले. या मोर्चात जिल्हाभरातून शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. या सभेनंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध-पालकमंत्री देशमुख



**गोंदिया :** शासनाच्या विविध योजना, मोहिम व अभियानांची जिल्ह्यातील जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने प्रभावी अंमलबजावणी करुन जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री अनिल देशमुख यांनी दिली.कारंजा येथील पोलीस कवायत मैदानावर ७१ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर उपस्थितांना संबोधित करतांना पालकमंत्री श्री देशमुख बोलत होते. पालकमंत्र्यांनी यावेळी ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

पालकमंत्री म्हणाले, पुरोगामी महाराष्ट्र हे देशातील एक समर्थ आणि संपन्न असे राज्य आहे. महाराष्ट्राने देशात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. कृषि, सहकार आणि औद्योगिक क्षेत्रातही आपला ठसा उमटविला आहे.

कोरोना सारख्या संसर्गजन्य आजाराचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने अत्यंत नियोजनबध्द उपाययोजना करुन कोरोना मुक्तीचा दर ९६.८५ टक्क्यावर आणला आहे. राज्याचा कोरोना मुक्ती दर ९५.१३ टक्के असून अन्य जिल्ह्याच्या तूलनेत गोंदिया जिल्ह्याचा कोरोनामुक्ती दर अधिक आहे. त्याचप्रमाणे कोविड आजाराने मृत्यू पावलेल्या रुग्णांची संख्या इतर जिल्ह्यापेक्षा कमी आहे.

कोरोनाचे संकट कमी झाले असले तरी धोका मात्र टळला नाही. जिल्ह्यात १६ जानेवारी रोजी कोरोनाची लसीकरण मोहिम यशस्-वीपणे राबविण्यात आली. जिल्ह्यात १० हजार लसी प्राप्त झाल्या असून ८ हजार ४२८ फ्रंटलाईन वर्कर्सची यादी तयार करण्यात आली आहे. कोविड लसीकरणाला सुरुवात झाली असली तरी काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. मास्क वापरणे, नियमित हात धुणे व सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक आहे.

जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून सन २०२०-२१ मध्ये २५३.६७ कोटी निधी प्राप्त झाला आहे. या निधीतून जिल्ह्याच्या विकासाच्या योजना राबविल्या जाणार आहेत. गोंदिया येथे ७ कोटी खर्च करुन जिल्हा नियोजन भवनाचे बांधकाम प्रस्तावित आहे. जिल्ह्यात असलेल्या सर्व नगर पंचायती करीता अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी ६.५० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत दराचा लाभ मिळावा म्हणून आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत जिल्ह्यात ११४ आधारभूत धान खरेदी केंद्र उघडण्यात आले. १८६८ रुपये प्रति क्विंटल दराने १६ लाख ९३ हजार ३४६ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली. ३६१ कोटी ७४ लक्ष ३१ हजार रुपये धान खरेदीचे शेतकऱ्यांना अदा करण्यात आले.

शासनाने यावर्षी धानाला ७०० रुपये बोनस जाहिर करुन धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. गोंदिया जिल्ह्यात रब्बी व खरीप हंगामासाठी ६५ हजार ३५३ खातेदारांना ३०८ कोटीचे पिक कर्ज वाटप करण्यात आले. जून ते ऑक्टोंबर २०२० मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी मत्स्यबीज व मासोळी लाभार्थ्यांना ३२.७९ लक्ष वाटप करण्यात आले. लॉकडाऊनच्या काळात बांधकाम कामगारांना शासनाने अर्थसहाय्य केले आहे. ३२ हजार ८७१ नोंदीत कामगारांच्या खात्यावर ६ कोटी ५७ लाखाची रक्कम जमा करण्यात आली आहे.

# डांगोरली बॅरेजचा प्रस्ताव शासनाला सादर



**गोंदिया:** बहुप्रतीक्षीत डांगोरली बॅरेजचा प्रस्ताव आमदार विन-ोद अग्रवाल यांनी शासनाला सादर केला आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनातच त्यांनी जिल्ह्याच्या आढावा बैठकीत डांगोरली बॅरेजचा मुद्दा मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्यासमोर लावून धरला होता. यवर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव सादर करावा असे निर्देश दिले होते.

डांगोरली बॅरेज हा आंतरराज्जीय प्रकल्प असून महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेतून वाहणाऱ्या वैनगंगा नदीच्या पात्रात डांगोरली येथे उच्च पातळी बंधारा निर्माण करुन बांधण्यात येणार आहे. आमदार अग्रवाल यांनी या बॅरेजची उंची ८ मीटर ठेवण्यासंबंधी आग्रह केला होता. ज्यामुळे तेढवा-शिवनी व नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजनेचे बळकटीकरण होणार आहे.

डांगोरली बॅरेजमुळे उपलब्ध पाणीसाठा १०.९१ एमएमक्यूब राहणार असून हजारो हेक्टर शेतजमिनीच्या सिंचन प्रकल्पांचे बळकटीकरण होण्यास मदत मिळणार आहे.

हा मुद्दा लावून धरत नागपूर सिंचन भवन येथे सिंचन विभागाच्या २४ डिसेंबरच्या बैठकीत प्रस्ताव मांडला होता. पाठपुरावा करण्यासाठी आमदार अग्रवाल यांनी मुंबई येथे जलसंपदा मंत्री जयंत पाटील तसेच जलसंपदा विभागाचे सचिव विजय गौतम यांची भेट घेऊन मंजुरी देण्याची मागणी केली होती.

# जिल्हा शल्य चिकित्सकासह ४ जण निलंबित,एक बडतर्फ तर एकाची बदली

**भंडारा:** सामान्य रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता कक्षाला लागलेल्या आगीत १० चिमुकल्यांचा जीव गेला होता. या प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सकांसह चार जणांना निलंबित करण्यात आले असून बालरोग तज्ञ असलेल्या एका डॉक्टरला बडतर्फ करण्यात आले आहे. चौकशी समितीच्या अहवालानंतर आरोग्यमंत्र्यांनी मुंबईत ही कारवाईची घोषणा केली.

आठ जानेवारीच्या रात्री जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नवजात शिशू अतिदक्षता कक्षात लागलेल्या आगीत दहा चिमुकल्यांचा जीव गेला होता. या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री यांनी विभागीय आयुक्तांच्या नेतृत्वात चौकशीसाठी समिती गठित केली होती. अकरा दिवसानंतर कालिया समितीने अहवाल शासनाच्या सुपूर्द केला. जिल्हा शल्य चिकित्सक संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले होते. दुर्लक्षामुळे ही घटना घडली असा निष्कर्ष समितीने काढल्यानंतर दोषींवर कारवाईची शिफारसही करण्यात आली होती. दरम्यान आज राज्याच्या आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी जिल्हा



शल्य चिकित्सक डॉक्टर प्रमोद खंडाते, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर रचना मेश्राम, अधिपरीचारिका शुभांगी साठवणे व स्मिता आंबीलडूके यांना निलंबित केले असून बाल रोग तज्ञ सुशील अंबादे यांना बडतर्फ करण्याचा निर्णय घेतला आहे. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक सुनिता बढे यांचे स्थानांतरण करण्यात आले आहे.

या कारवाईमुळे अकरा दिवसांपासून सुरू असलेले प्रतीक्षा चांगली आहे. अहवालाच्या आधारे आरोग्यमंर्त्यांनी कारवाई केली असली तरी सदोष मनुष्यवधाचा गुन्हे दाखल करण्याच्या मागणीकडे शासन किती गांभीर्याने पाहते याकडे पाहणे योग्य ठरेल.

# हा मोर्चा कुणाच्या विरुद्ध नाही तर ओबीसी प्रवर्गाच्या न्याय्यहक्कांसाठी

## जालना येथील ओबीसी मोर्चास सर्वपक्षीय नेते



**जालना :** इतर समाजास आरक्षण देताना ओबीसींच्या आर-क्षणास धक्का लावू नये आणि ओबीसी प्रवर्गाची जातनिहाय जनगणना करावी यासह अन्य मागण्यांसाठी जालना येथे मोर्चा काढण्यात आला. समारोपाच्या कार्यक्रमात मंत्री विजय वडेट्टीवार यांनी मोर्चाच्या वतीने सादर करण्यात आलेले निवेदन स्वीकारले. ओबीसी प्रवर्गातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन आपल्या न्याय्यहक्कांसाठी लढा देण्याचे आवाहन त्यांनी यानिमित्ताने केले.

भाजपचे खासदार विकास महात्मे, खासदार भागवत कराड, आमदार नारायण कुचे, आमदार अतुल सावे, राष्ट्रवादीचे आमदार संजय दौंड, काँग्रेसचे आमदार कैलास गोरंटआल आणि राजेश राठोड, नारायण कुचे यांच्यासह प्रकाश शेंडगे, माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शिवसेनेचे उपनेते व महाज्योतीचे संचालक लक्ष्मण वडले, शब्बीर अंसारी, माजी आमदार संतोष सांभरे, शिवाजी चौके, माजी नगराध्यक्ष भाष्कर आंबेकर, फुलचंद कराड, ओबीसी नेते बापुसाहेब कराडे, बलुतेदार संघटनेचे राज्यअध्यक्ष कल्याण दळे ,नगरसेवक अशोक पांगरकर, ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, सचिन राजुरकर यांच्यासह ओबीसी प्रवर्गातील अनेक नेतेमंडळी समारोपाच्या कार्यक्रमात श्रोत्यांमध्ये उपस्थित होते. व्यासपीठावर फक्त मंत्री वडेट्टीवार यांनी उपस्थित राहून एका विद्यार्थिनीच्या हस्ते ओबीसी प्रवर्गाच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले आणि उत्तरादाखल भाषण केले.राजेंद्र राख व डॉ.संजय काळबांडे यांनी मोर्च्याचे संचालन केले.

वडेट्टीवार म्हणाले, मंत्री म्हणून नव्हे तर एक कार्यकर्ता म्हणून आपण आलो आहोत. हा मोर्चा कुणाच्या विरुद्ध नाही तर ओबीसी प्रवर्गाच्या न्याय्यहक्कांसाठी आहे. इतरांच्या हक्काचे काढून घेण्याची आमची मागणी नाही. ओबीसी प्रवर्गातील नेतेमंडळी जोपर्यंत पक्षाच्या पलीकडे जाऊन विचार करणार नाहीत तोपर्यंत आपले प्रश्न सुटणार नाहीत.

"एवढ्या मोठ्या महाराष्ट्रात बारा बलुतेदारांच्या जाती असताना ओबीसी समाजात कुणी घुसण्याचा प्रयत्न करत असेल तर आम्ही पहारेकरी उभे आहोत. बहुजन कल्याण विभाग मंत्री म्हणून ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेची मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केलेली आहे. आवश्यकता पडल्यास स्वतंत्र जनगणनेचा प्रस्ताव मी विधानसभेत मांडेल. जेथे संधी मिळेल तेथे ओबीसी समाजाचा आवाज उचलून धरणार. पक्ष, जात विसरून फक्त आणि फक्त ओबीसी म्हणून उभा आहे." असं विधान राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार जालन्यात केलं आहे. ओबीसी समाजाची स्वतंत्रपणे जनगणना व्हावी, या मागणीसाठी जालन्यात महामोर्चा काढण्यात आला. या मोर्चात ओबीसी समाजाचे अनेक मोठे नेते सहभागी झाले होते. त्यावेळी मोर्चेकऱ्यांनी आता मुख्यमंत्री ओबीसीचाच असे बॅनर झळकावले आणि घोषणाही दिल्या.

यावेळी मंत्री विजय वडेट्टीवार यांच्यासह अनेक प्रमुख ओबीसी नेत्यांची उपस्थिती होती. या मोर्चाला सुरुवातीस पोलिसांकडून परवानगी देण्यात आली नव्हती. मात्र, नंतर मोर्चा काढण्यास पोलिसांनी सशर्त परवानगी दिल्याने, मोर्चा काढण्यात आला. यावेळी वडेट्टीवार यांनी मंत्री व ओबीसी नेते छगणराव भुजबळ व भाजपाचे दिवंगत नेते गोप-ीनाथ मुंडे यांची देखील आठवण काढली. आपल्याला ओबीसीकरीता लढण्याची प्रेरणा माजी मंत्री स्व. गोपीनाथ मुंडे व अन्न पुरवठा मंत्री छगणराव भुजबळ यांच्याकडूनच मिळाली असल्याचे त्यांनी बोलून दाखवत त्यांच्या संघर्षाला सलाम देखील केला. मी पक्ष, धर्म, जात-पात सोडून केवळ ओबीसीसाठी लढत असल्याचेही वडेट्टीवार यावेळी म्हणाले.

## ओबीसींची जनगणना आवश्यक आणि अनिवार्य : पंकजा मुंडे



आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील ओबीसी समाज आक्रमक झाला असतानाचा भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी ओबीसी समाजाला त्यांचा हक्क देण्याची मागणी केली आहे. रविवारी त्यांनी भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करून ही मागणी केली आहे.

गोपीनाथ मुंडे यांनी ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी लोकसभेत केलेल्या भाषणाचा हा व्हिडिओ आहे. या व्हिडिओसोबत पंकजा मुंडे यांनी "आम्हीही याच देशातील आहोत, आमचीही जनगणना करा: ओबीसींची जनगणना आवश्यक आणि अनिवार्य आहे' असे कॅप्शन दिले आहे. त्यामुळे ओबीसी समाजाच्या मागण्यांच्या मुद्द्यावरुन आक्रमक होण्याचे संकेत पंकजा मुंडे यांनी दिले आहेत.






## संपादकीय

### गणराज्य भारत देश व सामान्य नागरिकांच्या समस्या...

आज संपुर्ण देशात २६ जानेवारी हा "गणराज्य दिन' म्हणुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. भारताला स्वतंत्र मिळवुन देण्यासाठी ज्या महान सैनिकांनी व देशभक्तांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले त्यांना विनम्र अभिवादन करण्यात येते. तसेच २६ जानेवारी १९५० पासुन या देशात "संविधान' लागु झाले व हा देश "गणराज्य' देश झाला. खरी लोकशीहीची सुरुवात याचं दिवसा पासुन झाली. आज स्वातंत्र्याला ७१ वर्ष पुर्ण होत आहे. वर्धापनदिनी स्वातंत्र्याचा जयजयकार करित असतांना आपण सिंहावलोकन करण्याची गरज आहे. खरच आपण आचार, विचाराने स्वतंत्र झालो का? याचे चिंतन करणे आवश्यक आहे. संविधान अंमलात येऊन आज ७१ वर्ष होत असतांना संविधाना मधील नमुद केलेली सर्व उद्दिष्ट्ये आजही पुर्ण होऊ शकले नाही. त्याचे प्रमुख कारन म्हनजे येथिल शासन करनारे राज्यकर्ते. त्यांनाच नको आहे बहुजनांचा विकास. संविधानातील महत्वपूर्ण कलमानं मुळे देशाचा सर्व क्षेत्रात उल्लेखनीय विकास होईल. भारतीय संविधान प्रामाणिकपणे अंमलात आणले असते तर भारताचा वैज्ञानिक, तंत्रज्ञानिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास घडुन आला त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त विकास घडून आला असतां हे कटु सत्य नाकारतां येत नाही.

भारताचा पाहिजे त्या प्रमाणात सर्वांगीण विकास व्हायला हवा होता. परंतु मुठभर लोकांचाच विकास झाला. मुठभर लोकांचा विकास म्हनजे देशाची प्रगती नव्हे. ७५ टक्के लोक शेती उद्योगांवर अवलंबुन आहे. इतर देशांच्या तुलनेत कृषी क्षेत्रात कोसो दुर आपण आहोत. सतत नापिकमुळे भारतात लाखो शेतकरी आत्महत्या करित आहेत. सरकार शेती क्षेत्राचा इतर देशांच्या तुलनेत विकास करण्यास अपयशी ठरला आहे. वाढता भ्रष्टाचारात शेतकऱ्यास झळ पोहचली असुन तो या घालमेलीत उदध्वस्त होत आहे. महापुर, सावकारी कर्जाचा पाश, बॅकेचे कर्ज, नापीक आर्दीमुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करित आहे. हे देश हिताच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. देशाच्या पोशींद्याचे हाल होत आहे. तसेच या देशात बहुजनान वर सतत जातीय व्देषातुन हल्ले होत आहे. अनेक अन्याय अत्याचाराला ते बळी पडत आहेत. बरेच ठिकाणी महिलांना विवंस्त्र करुन गावातुन धिंड काढुन सामूहिक बलात्कार करित असल्याच्या घटना दररोज आपल्या वाचनात येत आहे. हे वाचुन, ऐकुन अतिशय चिड येते, आपण खरच स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत कि गुलाम देशाचे नागरिक आहोत हा प्रश्न पडतो. या भारत देशात मोठ्या प्रमाणात जातीयता, प्रांतवाद, भाषावाद, स्त्री-पुरुष असमानता, आतंकवाद, दहशतवाद, नक्षलवाद, उपासमार, गरिबी, निरक्षरता, अज्ञान, कुपोषण, अंधश्रद्धा, कर्मकांड, दैववादी दृष्टिकोन, जातीय हिंसाचार, बलात्कार, स्त्रीभूण हत्या, वाढती लोकसंख्या व महागाई याचे प्रमाण दिवसेन दिवस वाढतांना दिसत आहे. हे थांबविणे काळाची गरज आहे. केंद्र सरकार अपयशी ठरले आहे. तसेच संपुर्ण देशात नागरी दुरुस्त कायद्या लागु केल्यामुळे ठिक-ठिकाणी मोर्चे निघत आहेत. कित्येक दिवसा पासुन दिल्लीत शेतकरी आंदोलन करित आहेत. केंद्र सरकारचा विरोध मोठ्या प्रमाणात होतांना दिसत असुन नागरिकांच्या मनांत भितीचे व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. यामुळे बरेच ठिकाणी हिंसाचार होत आहे. देशातील प्रख्यात विद्यापीठांत विद्यार्थ्यांन वर भ्यांड हल्ले होत आहे. युवा पिढीला शिक्षणा पासुन वंचित ठेवण्याचे कट कारस्थान या देशात होतांना दिसत आहे. सध्याचे देशाचे चित्र अतिशय भयानक आहे.

जोपर्यंत भारतीय संविधानातील सार्वभौम, समाजवाद, धर्मनिर-पेक्ष, प्रजासत्ताक राष्ट्र, लोकशाही, समता, स्वातंर्त्य, बंधुभाव व सामाजिक न्याय या मुल्यांची सर्व भारतीयांच्या मनांत रुजणार नाही तोपर्यंत भारत देशाची प्रगती होणार नाही. संविधानात सर्वांना समान हक्क व अधिकार दिले आहे. "एक मत एक मूल्य' य संकल्पनेवर आधारीत भारतीय लोकशाही ही जगाच्या पाठीवर आजही आदर्शवत ठरणारी अशी अभिनव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते "राज्य घटना कितीही चांगली असली तरी तीची अंमलबजावणी करणारे जर अप्रामाणिक असतील तर राज्यघटनाच वाईट ठरल्या शिवाय राहणार नाही". असा स्पष्ट इशारा त्यावेळी देऊन ठेवला होता तो आज प्रत्येक्ष खरा ठरला आहे. या देशात राज्यकर्त्यांना संविधान नको आहे. या देशात पुन्हा मनुस्मृती हवी आहे. म्हनुनच संसदे जवळ संविधानाच्या प्रतिचे मनुवादी विचार सरणीच्या लोकांन कडुन दहन करण्याचा प्रयत्न होतांना दिसत आहे. हे देश विरोधी कृत्य असुन अशा कृप्रवृत्ती विरुध्द आवाज उठवुन देश विरोधी कट कारस्थान करणा-यांच्या विरुध्द कडक कार्यवाही करणे आवश्यक आहे. संविधानाचे संवर्धन करण्याची जबाबदारी समस्त भारतीयांची आहे. संविधानाचा अपमान होता कामा नये. हे तत्व आपण आजप-ासून आत्तापासुन स्विकारुन अंगिकारले पाहिजे, नाहीतर

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बांधव आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.

या प्रतिज्ञा बालपणा पासुनच आमच्या मनावर बिंबवल्या आहेत, त्या प्रतिज्ञाचा अर्थ राहणार नाही. असे छोटे-छोटे गैर समज दुर करुन संविधानाच्या माध्यमावर विश्वास ठेऊन व अंमल बजावणी करुन लोकशाही मजबुत करुया. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला भारत निर्माण करण्याच्या प्रक्रियेचे समर्थन एकजुटीने करुन हा संकल्प तडीस नेऊ या!!!!

**सुरेंद्र घरडे**
**८९९९७३९३९९**
**अमरावती**

# पालकमंत्र्यांच्या जनता दरबारात निवेदनांचा पाऊस

## धान खरेदी,गोसे सह विविध प्रश्न,संपूर्ण धान खरेदी होणार



**भंडारा:-** नागरिकांचे प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी पालकमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांनी आयोजित केलेल्या आजच्या जनता दरबारात निवेदनाचा अक्षरशः पाऊस पडला. धान खरेदी, गोसे पुनर्वसन, शिक्षण, अंशकालीन पद भरती, खासगी शाळेतील फी वाढ व पूरग्रस्तांना सानुग्रह अनुदान या समस्यांचा यात प्रामुख्याने समावेश होता. आलेल्या प्रत्येक निवेदनावर त्या त्या विभागाने कार्यवाही करुन पंधरा दिवसाच्या आत लेखी उत्तर दयावे असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

यावेळी आमदार राजू कारेमोरे, जिल्हाधिकारी संदीप कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय मून, जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी शिवराज पडोळे व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. पालकमंर्त्यांनी नागरीकांचे निवेदन स्वीकारुन करुन तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित विभागाला सोपविले.

निवेदन घेऊन येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे म्हणणे ऐकून घेऊन व त्यावर योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन देऊन पालकमंत्र्यांनी समाधान करण्याचा प्रयत्न केला. शेकडो नागरिकांनी लेखी निवेदन सादर करून जनता दरबारात आपल्या समस्या मांडल्या. यावेळी धान खरेदीबाबत मोठ्या प्रमाणात निवेदन प्राप्त झाली. धान उत्पादक शेतकऱ्यांचा सगळा धान खरेदी करण्यात येईल. कोणाचाही धान शिल्लक राहणार नाही अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली. धान भरडाई बाबत ३ फेब्रुवारी रोजी मुंबईत महत्वपूर्ण बैठक घेण्यात येणार असून या बैठकीत योग्य तोडगा काढला जाईल असेही त्यांनी सांगितले.

गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा असून पुनर्वसित गावात मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. या सगळ्या समस्या सोडवण्यासाठी बैठक घेण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या. दूध संघाच्या समस्याबाबत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंर्त्यांशी भेटून चर्चा करण्याचे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले.

ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी व नागरिकांचे नुकसान झाले आहे. काही पूरग्रस्तांना सानुग्रह अनुदान मिळाले नसल्याचे निवेदनावर तात्काळ अनुदान वाटप करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी यावेळी दिले. पूल व रस्ते याबाबतही यावेळी नागरिकांनी निवेदन दिली. तुमसर तालुक्यात असलेल्या दोन राज्याला जोडणारा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याचा प्रश्न यावेळी काही नागरिकांनी मांडल्या. यावर तोडगा काढण्याच्या सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या. होमगार्डना १ फेब्रुवारी पासून नियुक्ती देण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी यावेळी सांगितले.

ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी यावेळी करण्यात आल्या. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी आरोग्य विभागाला दिले.

रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत नागरिकांनी प्रश्न मांडला. प्रधानमंत्री आवास योजनेत घरकुल मिळण्यासाठी निवेदन, नौकरी, शिक्षण, फुटपाथ दुकानदार, वीज पुरवठा, कृषी पंप जोडणी, पीक विमा लाभ, दिव्यांग योजनांचा लाभ, वन विभागाचे पट्टे, आदी विषयावरील निवेदन यावेळी सादर करण्यात आली. या सगळ्या निवेदनावर संबंधित विभागाने तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# एशिया बुक ऑफ रेकार्डने दिपेश झाला ग्रँड मास्टर



**गोंदिया:** स्थानिक शास्त्री वार्ड निवासी दिपेश महेन्द्र सोनेवाने यांना "एशिया बुक ऑफ रेकार्ड" च्या अवार्डने सन्मानित करण्यात आले आहे. हा अवार्ड दिपेशला पेन्सिलच्या लिडवर मायक्रो आर्ट वर्कमुळे मिळाले आहे. २०२० मध्ये दिपेशला "इंडिया बुक ऑफ रेकार्ड" ने ही सम्मानित करण्यात आले आहे. आता दिपेशला " एशिया बुक ऑफ रेकार्ड " चा अवार्ड मिळाल्याने प्रजासत्ताकदिनी राज्याचे गृहमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

दिपेश सोनेवाने यांनी आतापर्यंत खुप सारे पेन्सिल च्या लिडवर मायक्रोआर्टच्या माध्यमातून निरनिराळ्या कलाकृती तयार केलेल्या आहेत.त्यात अनेक प्रकारचे नाव लिहिणे,सिंबाल्स तयार करणे, महान थोर पुरुषांच्या मुर्त्या तयार करणे, दुर्गा देवीची प्रतिकृती, पतंग धागा, शिवपिंड इत्यादी अनेक प्रकारच्या कलाकृती पेन्सिलच्या लिडवर तयार केले आहे. त्यातूनच त्याला एका कलाकृतीसाठी "एशिया बुक ऑफ रेकार्ड" चा अवार्ड मिळाला आहे.जे जगातील नविन सात आश्चर्याच्या वास्तू आहेत त्या सातही वास्तूंना दिपेशने एकाच पेन्सिलच्या लिडवर तयार केले आहे. त्यात ताजमहल, चीनची भिंत, किस्तो रेदेंतोर, पेट्रा, कलोसियम, माक्सू पिक्त्सू, चिचेन इत्सा अशा सात वास्तूंचा समावेश करण्यात आला .

जगातील सर्वात मोठा म्हणजे ५९७ फुट उंच स्टॅच्यू वल्लभभाई पटेल यांचा "द स्टॅच्यू ऑफ युनिटी" याला जगातील सर्वात लहान उंचीचा म्हणजे ०.७ से.मी. स्टॅच्यू पेन्सिल च्या लिडवर तयार करुन एक वेगळा रेकार्ड तयार करण्यात आला .या अवार्डचे ओपनिंग गोंदिया जिल्हयाचे अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले व सोबत महिला बालविकास विभागाचे विस्तार अधिकारी विनोदकुमार चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.

दिपेश सोनेवाने यांनी या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांना व बहिणिना दिले. जयंत मुरकूटे, रतीराम भांडारकर, मंगेष सोनेवाने, श्रृति सोनेवाने, स्नेहल सोनेवाने, श्रीकांत चुटे, अनिता मुरकूटे, संतोष भांडारकर, संजय आसटकर, रुपचंद रामटेककर, जयेश मुरकूटे, संतोष भांडारकर, भोजराज रणदिवे, दिनेश रामटेककर, संजय मुरकूटे, मनोज सोनेवाने, सुनिल तिवारी, राजेश कापसे, राजकुमार कुथे, शैलेश निकोडे, रेवाराम सोनवाने इत्यादींनी त्याचे खुप खुप अभिनंदन केले.तसेच या उत्साहात त्याचे मित्र नातेवाईक या सर्वानी त्याचे कौतूक जात आहे.

# देवरी तहसीलदारांची रेती माफियाविरोधात थेट कारवाई

**देवरी:** तालुक्यात मोठ्या प्रमाणा-वर फैलावलेल्या रेती माफिया विरोधात तहसीलदार विजय बोरुडे यांनी थेट कार्यवाहीचा बडगा उगारल्याने रेती तस्करांचा धाबे चांगलेच दणाणले आहे. प्राप्त तक्रारीच्या आधारे दि. २१ आणि २२ रोजी केलेल्या कार्यवाहीमध्ये १०० ब्रास रेता तहसील कार्यालयात पंचनामा करून जमा करण्यात आल्याची माहिती तालुका प्रशासनाने प्रसिध्दीसाठी दिली आहे.



प्रसिध्दीपत्रकानुसार, देवरी तालुक्यात गेल्या अनेक महिन्यापासून रेती तस्करीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याने प्रशास-नाची डोकेदुखी चांगलीच वाढली आहे. रेती तस्कर हे अवैधरीत्या रेती घाटांवरून प्रशासनाच्या डोळ्यात धूळ फेकून दिवसरात्र रेतीची वाहतुक करीत आहेत. ही अवैधरीत्या वाहतूक केलेली रेती गरजूना अव्वाच्या सव्वा दामाने विकून रेती तस्कर चांगलेच गब्बर बनल्याचे बोलले जात आहे. यामुळे शासनाचा महसुल सुद्धा मोठ्या प्रमाणावर बुडत होता. या रेती तस्करांच्या अरेरावीमुळे नागरिक सुद्धा कमालीचे वैतागल्याने त्यांनी प्रशास-नाला गोपनीय माहिती पुरविण्यास सुरवात केल्याचे सांगितले जाते.

या प्राप्त माहितीच्या आधारावर, तहसीलदार विजय बोरुडे यांनी दि. २१ आणि २२ रोजी थेट कार्यवाहीचा बडगा उगारला. भरारी पथकांची नेमणूक करून नदीकाठावरील उपसा केलेल्या रेतीचा पंचनामा करून १०० ब्रास रेती जप्त करून तहसील कार्यालयात जमा करण्यात आली. सदर जप्त केलेली रेती ही राधेशाम बोहरे शिलापूर, जवाहर शाहू देवरी आणि नरेश धरमशहारे भागी यांच्या शेतात उपसा करून ठेवण्यात आल्याने त्यांची सदर प्रकरणी चौकशी सुरू आहे. याशिवाय तालुका प्रशासनाला प्राप्त तक्रारीनुसार संशयित रेती माफिया म्हणून शिलापूर परिसरातील हंसराज रहिले, चंद्रकुमार मानकर, विजेश मानकर, जागेश्वर भोयर, नरेश भोयर, उमराव बावणकर, दिनेश बावणकर, मनोज तुरकर, पिंटू मुनेश्वर, इंद्रराज कोल्हे, विनोद फाये, सुभाष वंजारी आणि मेघराज तुरकर यांना चौकशी साठी बोलाविण्यात आल्याची माहिती श्री बोरुडे यांनी दिली आहे.

# प्रजासत्ताक दिनी गुणवंत विद्यार्थ्यांचा व कोरोना योध्दांचा सत्कार



**गोरेगाव:** पी.डी. राहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथे प्रजासत्ताक दिनी गुणवंत विद्यार्थी व कोरोना योध्दा यांचा सत्कार करण्यात आला. दहावी व बारावीच्या परीक्षेत गुणानुक्रमे चार गुणवंत विद्यार्थ्यांचे डॉ. ग्यानीरामभाऊ देशमुख मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट गोरेगाव ,स्व. अनंदाबाई फगलाल बघेले स्मृतीपुरस्कार, निर्मल कॉम्पुंटर गोरेगाव तर्फे पुरस्कार, आयसेक्ट कॉम्पुंटर गोरेगाव तर्फे पुरस्कार, देवून विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कोरोना काळात माझे कुटुंब माझी जबाबदारी उपक्रमात नगर पंचायत गोरेगाव येथे घरो-घरी जाऊन आरोग्य तपासणी व जनजागृती केली अशा शाळेतील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या दिनानिमित्ताने शाळेत ध्वजारोहण करण्यात आले .तसेच कार्यक्रम पार पाडताना कोवीड-१९ चे सर्व नियम पाळण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पी.एफ. बघेले माजी प्राचार्य हे होते. तर मा.डॉ.टी पी.येळे अध्यक्ष ग्रामहीता शिक्षण संस्था यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

हि.दा. येळे, बी.डी. पटले, तुमेरसिंग बघेले, विद्यार्थी व पालक, शाळेचे मुख्याध्यापक सी डी मोरघडे, व सर्व शिक्षक व शिक्षकेतर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सी.आर. बिसेन व सौ.एम.डी. राहांगडाले तर आभार प्रदर्शन ए.एच. कटरे यांनी केले.

**पान (१ वरुन)** कार्यक्रमास जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, उपवनसंरक्षक कुलराज सिंग, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माझे कुटूंब-माझी जबाबदारी मोहिमेअंतर्गत "जनजागृती पुस्तिकेचे' पालकमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

# कचारगड देवस्थान विकासाच्या प्रतीक्षेत



**सालेकसा:** देशातील मोठी गुफा आणि आदिवासी बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या कचारगड देवस्थानाकडे शासन आणि प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. प्रशासनाने या स्थळाच्या विकासाकडे लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

तालुक्यातील कचारगड/धनेगाव येथील पारी कोपार लिंगो, माँ काली कंकाली देवस्थान आदिवासी गोंडीयन समाजाचे राष्ट्रीय स्तरावरील व देशातील सर्वात मोठी गुहा म्हणून ओळख आहे. या स्थळाला प्राचीन संस्कृती, धार्मिक व ऐतिहासीक असे महत्व आहे. देशातील १५-१६ राज्यातील आदिवासी भाविक दर्शनासाठी येथे भेट देतात. परंतु या ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने हे ठिकाण विकासापासून कोसो दूर आहे. याकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची मागणी देवस्थान समितीने केली आहे. पारी कोपार लिंगो, माँ काली कंकाली देवस्थानाला विकासकामाकरिता पर्यटन क्षेत्र विकास, तीर्थक्षेत्र विकास तसेच आदिवासी विकास यामधून निधी मिळत असते. परंतु या निधीचा विविध शासकीय यंत्रणांनी वाट लावल्याचे दिसून येत आहे.

**पैसे उकळण्याचा सपाटा सुरु**

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते, पायऱ्या बनविले असून ते काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात आले. तर संरक्षण भिंत व रेलिंग पायऱ्या अपूर्णच आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग जि.प.गोंदिया यांनी नाल्या, सिमेंट रस्ते, रेलिंग ब्लाक, सपाटीकरणामध्ये कंत्राटदाराकडून पैसे उकळण्याचा सपाटा सुरु ठेवून काम निकृष्ठ दर्जाचे केले. विद्युत विभागाने गल्लीपासून दिल्लीपर्यंत सारखे विद्युत केबल टाकले. परंतु तेही दरवर्षी खराब होत आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा विभागानेही तसेच कचारगड परिसरात पाणी पोहोचवू शकले नाही. लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन येथील अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी पारी कोपार लिंगो, माँ काली कंकाली देवस्थान कचारगड/धनेगाव समितीच्यावतीने करण्यात आली आहे.

# कवठ्यातील महिलांनी उभारला महाराष्ट्रातील पहिला सोलर पॅनल निर्मिती उद्योग

महिला बचत गटांचे उद्योग म्हणजे केवळ कुरड्या, पापड्या, मसाले, लोणचे, शेळी पालन, कुक्कुटपालन, सामूहिक शेती आदीपर्यंत सीमित असल्याचे दिसून येते. मात्र वर्धा जिल्ह्यातील महिला बचत गटांनी याला छेद देत ज्या उत्पादनात मोठ्या कंपन्यांची मक्तेदारी आहे अशा सोलर पॅनल निर्मितीचा उद्योग उभारून महिलांच्या बळकटीकरणाला एक नवा आयाम दिला आहे.

देशात साधारणतः मोठ्या कंपन्यांमार्फत सोलर पॅनलचे उत्पादन केले जाते. मात्र वर्धा जिल्ह्यातील फारसे शिक्षण न झालेल्या बचत गटाच्या महिलांनी सोलर पॅनल निर्मितीसारख्या तांत्रिक कामामध्ये प्राविण्य मिळवून उद्योगात भरारी घेणे ही अचंबित करणारी पण सत्यात उतरलेली घटना आहे. ग्रामीण भागातील महिला बचत गटामार्फत सोलर पॅनल निर्मीतीचा उद्योग उभारणे हे महाराष्ट्रातील पहिले आणि देशा-तील दुसरे उदाहरण आहे.

महिला बचत गटांच्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी वर्धा जिल्हा अग्रेसर राहिला आहे. येथील बचत गटांच्या महिला उमेद अभियानांतर्गत इतर जिल्ह्यात जाऊन महिलांना बचत गटाचे कार्य कसे असते याबाबत प्रशिक्षणही देतात. त्याचबरोबर बँक सखी, पशुसखी, कृषी सखी अशा विविध क्षेत्रात काम करून महिला स्वतःच्या उपजीविकेसोबतच गाव-ातील लोकांना मार्गदर्शन करण्याचे कामही करीत आहेत. देवळी तालुक्यातील कवठा झोपडी गावात उमेद अभियानांतर्गत बचत गट व ग्रामसंघ तयार करण्यात आले असून महिलांच्या एकत्रीकरणातूनच उद्योगाची संकल्पना पुढे आली. या गावात मागासवर्गीय महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.




गावातील तेजस्वी सोलर एनजी मागासवर्गीय संस्था म्हणजे स्वतः महिलांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी बनवलेली एक महिला औद्योगिक को-ऑपरेटिव्ह संस्था आहे. तेजस्वी सोलर एनजीची सुरुवात मार्च २०१८ मध्ये झाली. तेजस्वी सोलर एनजी मागासवर्गीय महिला औद्योगिक प्रकल्पाची नोंदणी को-आपरेटिव्ह सोसायटी अंतर्गत करण्यात आली असून त्यामध्ये २१४ महिला सम भागधारक आहेत. त्यापैकी २०० महिला ह्या मागासवर्गीय आहेत.

आय. आय. टी. मुंबई ही संस्था अपांरपारिक ऊर्जा मंत्रालयासोबत अपारंपरिक ऊर्जेवर काम करते. "शाश्वत ऊर्जा इको सिस्टीम स्थानिकांकडून स्थानिकांसाठी' या संकल्पनेवर आधारित त्यांचे काम आहे. स्थानिकांमार्फत निर्मिती केल्यामुळे सोलर पॅनलची किंमत कमी करण्यासोबतच स्थानिकांच्या कौशल्यात भर पडून स्थानिक अर्थव्यवस्था बळकट करणे आणि रोजगार निर्मिती होवून स्थानिकांच्या उत्पन्नात वाढ करणे हा त्यांचा उद्देश आहे. राजस्थान येथील डुंगरपूर येथे प्रायोगिक स्तरावर त्यांनी सोलर निर्मितीचा प्रकल्प उभारला. ग्रामीण महिला तांत्रिक पद्धतीचे काम करूशकतात हे लक्षात आल्यानंतर त्यांनी वर्धा जिल्ह्यात असा प्रकल्प उभारण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी यांना विचारणा केली असे आय. आय. टी. मुंबईचे प्रकल्प व्यवस्थापक अमित देशमुख यांनी सांगितले.

**आम्ही गावातील महिला, बचत गट चळवळीच्या मार्फत उद्यमशील होण्याचा प्रयत्न करीत आहोत. आमच्या कवठा (झोपडी) या गावात बहुसंख्य महिला मागासवगीय समाजाच्या असून समाजकल्याण विभागामार्फत "नाविन्यपूर्ण योजनेतून महिलांकरिता आमच्या गावात सोलर पॅनल निर्मितीचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. त्यामार्फत महिलांना सोलर पॅनल तयार करण्याचे प्रशिक्षण मिळाले,असून त्याकरिता आमच्या गावातच कंपनी उभारण्यात आलेली आहे त्यामार्फत सोलर पॅनल, सोलर स्ट्रीट लाईट, होम लाईट तयार होत आहेत."**

**संगीता वानखेडे - (संचालक, तेजस्वी सोलर एनजी, कवठा झोपडी ता.देवळी,जि.वर्धा)**

सुरुवातीला या प्रकल्पातील १२ महिलांना दुर्गा सोलर एनजी (डुंगरपुर, राजस्थान) येथे सोलर पॅनल निर्मितीचे प्रशिक्षण दिले. त्यानंतर वर्षभर अमित देशमुख यांनी गावात राहून महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले. यात कंपनी चालविण्यासाठी ला-गणारे कौशल्य, माहिती तंत्रज्ञान, आर्थिक व्यवस्थापन, अकाऊंट, टॅली, कच्चा माल ऑनलाईन मागविणे, उत्पादित माल विक्रीसाठीचे कौशल्य आदी बाबींचा समावेश होता. खरेतर एक वर्षात आम्ही इंजिनिअर महिला घडवून त्यांना उद्योगासाठी लागणाऱ्या सर्व बाबींसाठी परिपूर्ण केले आणि हे अतिशय कठीण काम होते असे देशमुख म्हणतात.

तत्कालीन जिल्हाधिकारी शैलेश नवाल यांच्या प्रयत्नातून समाजकल्याण विभागामार्फत नाविन्यपूर्ण योजनेतून कावठा झोपडी येथील ग्रामसंघासाठी २ कोटी ६२ लक्ष कोटीचे भागभांडवल तेजस्वी सोलर एनजी मागासवगीय संस्थेला मंजूर केले आहे. त्यापैकी १ कोटी ८३ लक्ष रूपये उपलब्ध करून दिले आहे. यातून फॅक्टरी शेड बांधकाम, शेड उभारणे मशिन खरेदी व उभारणी आदी बाबी करण्यात आल्या. यासाठी महिलांना प्रकल्प अहवाल तयार करून त्याला जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेणे, को-ऑपरेटिव्ह संस्था म्हणून नोंदणी तसेच वस्तू व सेवा कर नोंदणी इत्यादी कामे करण्यासाठी वर्धा उमेद अभियानयामार्फत महिलांना सहकार्य करण्यात आले.

**"वर्धा जिल्हा हा नेहमीच बचतगटांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाकरिता अग्रेसर राहिलेला आहे. महिलांना शाश्वत रोजगार मिळून देणे हा उदेश आहे कावठा येथील महिलांच्या या उद्योगामुळे त्यांच्या कुटुंबाच्या उत्पादनात वाढ होऊन जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे."**

**डॉ.सचिन ओंबासे**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.वर्धा)**

आज कवठा (झोपडी) या गावात कंपनीच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून पॅनल तयार करण्याचे काम सुरू आहे. तसेच सोलर पॅनल, सोलर स्ट्रीट लाईट व सोलर होम लाईट इत्यादी बनविण्याचे कामही महिला करीत आहेत. या कामात ४० महिला अगदी निष्णात झाल्या आहेत. काही महिला अकाऊंट, काही महिला मार्केटिंग मध्ये प्राविण्य प्राप्त झाल्या आहेत. महिलांद्वारा संचालित या कंपनीला नुकतेच जिल्हा परिषदेमार्फत ४० लाख रूपयांचे ग्रामीण भागात स्ट्रीट लाईटचा पुरवठा करण्याचे कामही मिळाले आहे.

महिला चांगल्या व्यवस्थापक होऊ शकतात असे म्हटले जाते. मात्र कवठा सारख्या ग्रामीण भागातील अगदी जुजबी शिक्षण घेतलेल्या महिलांनी सोलर पॅनल सारख्या तांत्रिक वस्तूच्या उत्प-ादनाचा उद्योग उभारणे आणि त्यात स्वतः प्राविण्य मिळवणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे आहे. प्रकल्पामुळे महिलांना निश्चितच शाश्वत रोजगार होऊन त्यांचे भविष्य उज्वल होईल यात शंका नाही.

**मनीषा सावळे, जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# आठ गावांना विकास शिवलाच नाही

**आमगाव:** गावाचा विकास पूर्णपणे नगरपरिषद, नगरपंचायत किंवा ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून होते. तशी तरतुदच आहे. मात्र या संवैधानिक बाबीपासून आमगाव अणि त्याला लागून असलेली सात अशी एकुण आठ गावे अपवाद ठरली आहेत. योग्यप्रकारे ग्राम पंचायतीच्या माध्यमातून कामकाज चालत असताना नगर पालिकेच्या भानगडीत पडल्यामुळे ही आठही गावे आता विकासात वांझोटी ठरली आहेत. स्थानिक नेत्यांच्या आपसी भांडण आणि श्रेयवादामुळे विकासाच्या रथाची चाके ठप्प पडली.

आमगाव, बनगाव, रिसामा, पदमपुर, किडंगीपार, माल्ही, कुंभारटोली आणि बिरसी या आठही गावांना मानसीक, शारीरिक आणि विकासात्मक बाबींचा ताप सहन करावा लागत आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्रत्येक तालुकास्तराला नगर पंचायतीचा दर्जा दिला. आमगावला लोकसंख्येच्या आधारावर नगर पंचायतीचा दर्जा देण्यात आला. येथूनच पक्षवादाला खऱ्या अर्थने सुरुवात झाली. सर्वप्रथम काही नेत्यांनी मिळून नगरपंचायतीवर आक्षेप घेत आमगावला नगरपालिकेचा दर्जा देण्यात यावा, त्याकरिता आमगावसह इतर सात गावे जोडण्यात यावी, अशी मागणी करण्याची याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. न्यायालयाने ६ जानेवारी २०१७ मध्ये सातही ग्रामपंचायतीकडून अभिप्राय अणि आक्षेप मागविले. ६ ग्रामपंचायतींनी विरोधात ठराव दिले. असे असताना देखील राज्यातील सरकारने ग्रामपंचायतीच्या आक्षेपावर विचार न करता हिटलरशाहींचा प्रत्यय देत २ ऑगस्ट २०१७ रोजी आमगाव येथे नगरपरिषदेला मान्यता देत निवडणुकीची प्रक्रीया देखील सुरु



केली. याच प्रक्रियेपासून खऱ्या अर्थाने आठ गावांच्या मागास-लेपणाचा प्रवास सुरु झाला.

शासनाच्या या दडपशाही, हुकूमशाहीच्या विरोधात लोकशाही मार्गाचा अवलंब करत ६ सप्टेंबर २०१७ रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. परिणामी २८ नोव्हेंबर २०१७ रोजी आमगाव नगर पालिकेची स्थापना करताना कायदा आणि संवैधानिक बाबींची पूर्तता करण्यात आली नसल्यामुळे नगरपालिकेचा निर्णय रद्द करुन आमगाव वगळता सा-तही गावांमध्ये ग्रामपंचायती पूर्ववत करण्याचा निर्णय दिला. मात्र या निर्णयाच्या विरोधात शासन आणि काही स्थानिक नेत्यांनी धाव घेत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. परिणामी पुन्हा एकदा स्टे मिळाला. मात्र सद्यस्थितीत हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

नगरपालिका आणि नगर पंचायत हे दोन्ही नगर विकास खात्यांतर्गत येतात असे असताना देखील श्रेयवादाच्या लढ्यामुळे विकासाच्या कामांची गती थांबली आहे. नगर पालिका झाल्यास कादयानुसार मग्रारोहयोची कामे नगर पालिका क्षेत्रात करता येत नाहीत. आमगाव वगळता इतर सात गावांत देखील मग्रारोहयोची कामे होणार नाहीत. त्या गावांत उद्योगधंदे देखील नाहीत. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी उपजिवीकेकरिता काय काम करावे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

गेल्या पाच वर्षापासून क्षेयवादाच्या लढ्यात ग्रामीणांच्या हातातील रोजगार हिरावला गेला आहे. त्याला जबाबदार कोण, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. शहराचा विकास म्हणजे रस्ते, इमारती इतकाच अर्थ होतो. मात्र नगर पालिकेच ग्रामीण भाग येत असल्यामुळे तेथील नागरिकांना रोजगार, उपजिवीकेकरिता साधन, राहण्याकरिता घर, शेतीला सिंचन, शेतकऱ्याच्या शेतमामाला दर या बाबींकडे सत्ताधारी दुर्लक्ष का करत आहेत, असाही सवाल उपस्थित होत आहे.

# प्रकरण अवैद्य गौणखनिजाचे,कारवाई मात्र मोटार वाहन कायद्यांतर्गत!

**गोंदिया:** एकाच गुन्ह्याची शिक्षा दोन वेळा देण्यासंदर्भात कायद्यात कोणतीही तरतूद नाही. परंतु, अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणी महसुल कायद्यातंर्गत दंडात्मक कारवाई झाल्यानंतरही जिल्हा प्रशासनाने उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांमार्फत मोटार वाहन कायद्याअंतर्गत कारवाईचे आदेश दिले. हा धक्कादायक प्रकार राज्यात केवळ गोंदिया जिल्ह्यात झाला असावा. जिल्हा प्रशासनाच्या या अजब फतव्यामुळे मात्र, आज अनेक लोकांवर रोजगार हिरवण्याची वेळ आली असल्याचे दिसत आहे.



याबाबतचे वृत्त असे की, २१ डिसेंबर २०२० रोजी गोंदियाचे अप्पर जिल्हाधिकारी यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांच्या नावाने काढलेल्या पत्रानुसार, १ एप्रिल २०२० ते १५ डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये गौणखनिजांचे उत्खनन व वाहतूक प्रकरण याअनुषंगाने संबंधित वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ व केंद्रीय वाहन नियम १९८९ अन्वये कारवाई करण्याचे निर्देश दिले. यामध्ये ज्या वाहन चालकांनी अवैध गौणखनिज वाहतूक संदर्भात दंड भरला होता, अशा १०५ वाहनांचा समावेश आहे. वास्तविक या सर्व वाहनांनी अवैध गौणखनिज वाहतुक संदर्भात १२ जानेवारी २०१८ रोजी काढलेल्या शासन निर्णयातील कलम ४८ (९) नुसार दंड भरला होता. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी कागदपत्रे व वैयक्तिक बंधपत्राच्या आध-ारावर संबंधित वाहनांना सोडण्याचे आदेश दिले होते.

असे असतानाही, जिल्हा प्रशासनाने विशिष्ट कालावधीची मर्यादा ठेवून मोटार वाहन कायद्यातंर्गत प्रतिबंधक कारवाईसाठी दिलेले निर्देश अनेक प्रश्न निर्माण करणारे ठरते. मुख्य म्हणजे, अवैध गौणखनिज वाहतूक करताना संबंधित वाहनाचे योग्य पंचनामा होणे अपेक्षित असते. परंतु महसूल विभाग केवळ दंडात्मक कारवाईवर भर देत असल्याने अनेकदा वाहनांची योग्य तपासणी होतच नाही. जिल्हा प्रशासनाद्वारे १ एप्रिल २०२० ते १५ डिसेंबर २०२० या कालावधी दरम्यान अवैध गौणखनिज वाहतुकीत दंड भरणारे वाहनांची निवड केली. परंतु, संबंधित तारखेच्या पूर्वीच त्यानंतर झालेल्या अवैध गौणखनिज वाहतुकीचे काय? असा प्रश्न देखील निर्माण होत आहे.

अवैध गौणखनिज वाहतुकीचा विचार केल्यास, जिल्ह्यातील ७० टक्के गौणखनिजाची अवैध वाहतूक ही गोंदिया शहरासह तालुक्यात होत असताना या यादीमध्ये शहरातील एकाही टिप्परचे नाव नाही, हा एक संशोधनाचा विषय ठरत आहे. जिल्हा प्रशासनाकडून प्रतिबंधात्मक कारवाई संदर्भात सांगितले असले तरी ज्यांच्यावर ही कारवाई होणार आहे, त्यांनी अगोदर दंडात्मक कारवाई भो-गली असताना जिल्हा प्रशासनाची ही भूमिका त्यांचे आर्थिक गणित कोलमडारे ठरवित असल्याचे दिसते. यात कारवाई झाल्यास अनेकांचा रोजगारही हिरावल्या जाण्याची शक्यता आहे. तेव्हा जिल्हा प्रशासनाने २१ डिसेंबर २०२० चे आदेश रद्द करावेत, अशी मागणी या वाहन चालकांकडून होत आहे.

**दोन्ही कायद्यात तफावत...**

अवैध गौणखनिज उत्खनन कायदा व मोटार वाहन कायदा हे दोन्ही कायदे वेगळे आहेत, याचे नियमही वेगळे आहे. अवैध गौणखनिज उत्खननात दंड आकारला जातो. तर मोटार वाहन कायद्यातंर्गत संबंधित वाहनांचे कागदपत्रे, विमा, चालकाचा परव-ाना, वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र या कागदांची पुर्तता महत्वाची ठरते. याशिवाय वाहन अतिरिक्त भार वाहून नेत असेल तर हा कायदा लागू होतो. परंतु जिल्हा प्रशासनाने अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणी दंडात्मक कारवाई झालेल्या वाहनांवर उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना मोटार वाहन कायद्याअंतर्गत कारवाईचे दिलेले निर्देश न समजणारे कोडेच ठरत आहे.

**पालकमंत्र्यांनी दखल घेण्याची मागणी**

अवैध गौणखनिज वाहतूक प्रकरणात संबंधित वाहनांवर दंडात्मक कारवाई झाली असताना जिल्हा प्रशासनाचे २१ डिसेंबर २०२० चे निर्देश या वाहनांवर अन्यायकारक असेच आहै. मोठ्या प्रमाणात दंडाची रक्कम भरुनही जिल्हा प्रशासनाने हे आदेश काढले. त्यामुळे छोट्या व्यावसायीकांवर कोरोना काळात मोठे आर्थिक संकट ओढावू शकते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाचे आदेश मागे घेण्यासाठी जिल्ह्याच्या पालकमंर्त्यांनी दखल घेण्याची मागणीही वाहन चालकांनी केली आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कारवाई : चव्हाण**

याअनुषंगाने प्रतिनिधीने गोंदियाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांना विचारणा केली असता, ते म्हणाले की, जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे आपले काम असून त्या अनुषंगाने कारवाई होत असल्याचे ते म्हणाले. आपल्या विभागात मनुष्यबळ कमी असल्याने संबंधित पोलिस ठाण्यांना वाहनांवर कारवाई करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

# मतदार हा लोकशाहीचा आधार:जिल्हाधिकारी



**गोंदिया:** लोकशाही बळकटीकरणासाठी मतदारांची भूमिका महत्वाची आहे. प्रत्येक नागरिक ज्यांनी वयाची १८ वर्ष पूर्ण केली आहे त्या सर्व नवमतदारांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करुन मताधिकार बजावून लोकशाहीला बळकट करावे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, भा.प्र.से. परिविक्षाधीन अधिकारी सावन कुमार, एनएमडी कॉलेजचे प्राध्यापक डॉ.शशिकांत चौरे, राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर बन्सोड यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रारंभी भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निर्वाचन आयुक्त सुनील अरोडा यांचे व्हिडिओ संदेश प्रसारीत करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डांगे यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त नवमतदारांना कर्तव्य व निष्ठा यांचे पालन करुन मतदानाचा हक्क बजावून योग्य प्रतिनिधींची निवड करुन लोकशाहीला सशक्त बनवून जागरुक मतदार असल्याची भूमिका बजावणे महत्वाचे असल्याचे सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात सीमा तुरकर, रोहित शेंद्रे, अनुप लिल्हारे, सुरेंद्र चिखलोंडे, प्रियंका चिखलोंडे, हेमा बेलगे, दिप बिसेन, निकुंज भेलावे, संस्कार अग्रवाल, प्रज्ञा पारधी व निकिता चौधरी या नवमतदारांना नविन मतदान ओळखपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी यांनी केले. संचालन आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले तर उपस्थितांचे आभार आर.एस.पटले यांनी मानले. कार्यक्रमास जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, अपर तहसिलदार अनिल खडतकर, नायब तहसिलदार राजाराम पटले, सहायक कोषागार अधिकारी एल.एच.बाविस्कर, पोलीस निरीक्षक कदम, अमित पाथोडे, अशोक मस्करे व दिनेश काळसर्पे उपस्थित होते.

# पक्षाचे कार्य जनसामान्यपर्यंत पोहचवा : माजी आ.जैन




**गोंदिया :** जिल्ह्यात खा. प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वात अनेक विकासात्मक कामे करण्यात आली. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यापासून विकास कामांची गती वाढली आहे. पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणारी कामे जनसामान्यांपर्यंत पोहचवावेत, असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

आगामी जिप व पंस निवडणुकीच्या अनुषंगाने सडक अजुनी तालुक्यातील बाह्मणी खडकी व शेंडा येथे आयोजित सभेत ते बोलत होते. याप्रसंगी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, गंगाधर परश-ुरामकर, तालुकाध्यक्ष डॉ. अविनाश काशीवार, महिला तालुकाध्यक्ष रजनी गि?हेपुंजे, दिनेश कोरे, आशिष येरणे उपस्थित होते. प्रसंगी आ. चंद्रिकापुरे यांनी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणा?या जनहिताच्या कामाची माहिती पोहचवून पक्षाचा विस्तार करावा असे सांगितले. दरम्यान आ. जैन यांनी आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून आढावा घेतला. सभेला अविनाश कोरे, अल्लाउद्दीन राजानी, छाया चौव्हाण, आनंद ईळपाते, प्रमिभा कोरे, शिवाजी गहाणे, दिनेश कोरे, रमेश ईळपाते, एफ.आर.टी शाह, कृष्ण ठलाल, चंदू बहेकार, शारदा मेर्शाम, दिनेश सलामे, हिरालाल डोंगरे आदी उपस्थित होते.

# गोंदियाच्या व्यापारी बाप-लेकाचे नागपुरात अपहरण

**गोंदिया :** कपडे खरेदीसाठी गोंदिवरून नागपूरला गेलेल्या बाप-लेकाचे एका कार चालकाने अपहरण केले. तसेच त्यांना बंदुकीचा धाक दाखवून लुटले. ही घटना २१ जानेवारीच्या रात्री घडली. २३ जानेवारी रोजी पीडित व्यापा?याने नागपूर येथील गणेशपेठ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे.

प्रवीण प्रभूदास बजाज रा. शंकर चौक गोंदिया असे फिर्यादीचे नाव आहे. ते कापडाचे व्यापारी आहेत. २१ जानेवारी रोजी ते आपला मुलगा आर्यन याच्यासह कापड खरेदीसाठी नागपूरला गेले होते. कापड खरेदीनंतर ते रात्री ११ वाजता बस स्थानकावर पोहचले. त्यावेळी गोंदियाकडे येणारी शेवटची बस निघून गेली होती. त्यामुळे ते बस स्थानकावरच रात्री थांबण्याच्या तयारीत होते. परंतु, त्याचवेळी एक व्यक्ती त्यांच्याजवळ आला व गोंदियाला जाण्याबाबत बोलला. तसेच त्या बाप-लेकांना गोंदियाला जाण्यासाठी जाधव चौकात उभी असलेल्या कारमध्ये बसण्यास सांगितले. त्या कारमध्ये आधीच दोन व्यक्ती बसून होते.

# खताची साठेबाजी करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**गोंदिया:** - जिल्ह्यात रासायनिक खतांचा तुटवडा व काळाबाजार होऊ नये, यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने धाडसत्र राबविण्यात येत आहे. यातंर्गत २३ व २४ जानेवारी रोजी धाडसत्र राबवून गोरेगाव तालुक्यातील बबई येथे खत साठेबाजी करणा?या दोघांवर गुन्हे दाखल करुन १.४२ लाख किमतीचे रासायनिक खत जप्त करण्यात आले.




जिल्हा कृषी विभागाद्वारे दरवषी खरीप व रब्बी हंगामातील खताचे नियोजन करण्यात येते. तसेच खतांचा तुटवडा होऊ नये व काळाबाजार होऊ नये, यासाठी धाडसत्र राबविले जाते. यंदाही ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

यातंर्गत यंदा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली धाडसत्र राबवित असताना गोरेगाव तालुक्यातील बबई येथे विक्री करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरित्या रासायनिक खतांचा अवैधसाठा असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली. या माहितीच्या आधारे २३ व २४ जानेवारी रोजी पाळत ठेवून बबई येथील एका घरातून किसान प्लस (२०:२०:०५) या रासायनिक खताच्या १२७ बॅग जप्त करुन गोरेगाव पोलिस ठाण्यामध्ये जमा करण्यात आल्या. या खताची किंमत १.४२ लाख रुपये आहे.

याप्रकरणी श्री किसान बायो एग्रीटेक, जबलपूरचे अभिकर्ता व ज्याच्या घरी खताचा साठा सापडला, त्याच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक, गोरेगाव तालुका कृषी अधिकारी व गोरेगाव पंसचे कृषी अधिकारी यांच्या पथकाने पार पाडली.

# तिरोड्यातील महात्मा फुले वॉर्डाला आजही पट्ट्यांची प्रतीक्षा

**गोंदिया:** तिरोडा शहरातील महात्मा फुले वॉर्डात मागील ५० वर्षांपासून नागरिकांचे अधिवास आहे. मात्र, हे परिसर झुडपी जंगलात मोडते. येथील नागरिकांनी पट्टे मिळावे यासाठी मागील वषी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यांनी तीन महिन्यात समस्या मागी लावण्याचे आश्वासन दिले होते. पण त्यांची बदली होऊन खूप काळ लोटला व समस्या 'जैसे थे' असल्याने त्यांचे आश्वासन आता हवेतच विरले आहे. तिरोड्यातील महात्मा फुले वॉडातील रहिवासी आजही पट्यांच्या प्रतीक्षेत असून आता विद्यमान जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देवून प्रकरण मागी लावावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

सविस्तर वृत्त असे की, तिरोडा शहरातील महात्मा फुले वॉर्ड झुडपी जंगल परिसरात मोडतो. येथे नागरिकांचे वास्तव्य मागील ५० वर्षांपासून आजतागायत आहे. निवाऱ्याची सुविधा व्हावी, या उद्देश्याने ५० वर्षांपूर्वी येथे




नागरिकांनी अतिक्रमण केले होते. झोपड्या तयार करून आ-पले वास्तव्यसुद्धा सुरुकेले. काही लोकांनी मातीची घरे तयार केली. ती घरे आता अतिशय जीर्ण झाली आहेत. येथील बहुसंख्य नागरिक हे बीपीएल गटातील आहेत. बीपीएल धारकांचे जीवनमान उंचावण्यासाठी अनेक योजनांचा नगर परिषदेने लाभ सुद्धा दिला आहे.

सिमेंटचे रस्ते, नाल्या, विद्युत पुरवठा, पिण्याच्या पाण्याची सोय, समाजमंदिर समाजभवन तथा शौचालय निर्माण केले आहेत. परंतु हे क्षेत्र झुडपी जंगल परिसरात मोडत असल्याचे सांगून आवास योजनेचा लाभ देताना शासन-प्रशासन येथील नागरिकांशी तुघलकी धोरणाचा अवलंब करीत आहे, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

सध्या केंद्र आणि राज्य स्तरावरून घरकुलाची योजना कार्यान्वित आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यास आणि नगर परिषदेला देण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. महात्मा फुले वार्डातील नागरिकांनी अनेकदा आपल्याला सदर घराचे पट्टे मिळावे, यासाठी मागणी केली. शासकीय कार्यालयात जाऊन आपले जोडे झिजविले. मात्र, आश्वासणापलीकडे त्यांना काहीच मिळत नाही. समस्या तशीच रेंगाळत आहे. येथील नागरिकांना जीवनयापन करण्यास, पक्या निवाऱ्याची सोय करताना किंवा लाभ देण्यासाठी वेठीस धरले जात आहे.

तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन विरले, विद्यमान जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घाल-ावे माजी आ.दिलीप बंसोड यांच्या नेतृत्वात नागरिकांनी २२ जानेवारी २०२० रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन समस्या मागी लावण्यासाठी चर्चा करण्यात आली होती. त्यांनी ३ महिन्यांत समस्यांचे मागी लावण्याचे आश्वासन दिले होते.

दरम्यान कोविड-१९ चा प्रादुर्भाव झाला. आणि तत्कालीन जिल्हाधिकारी यांची बदली झाली. त्यामुळे त्यांचे आश्वासन फलीभूत होऊ शकले नाही आणि महात्मा फुले वॉडातील नागरिकांची समस्या 'जैसे थे' आहेत. आता याकडे विद्यमान जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालावे आणि तिरोड्याच्या महात्मा फुले वॉडातील झुडपी जंगल जमिनीचा तिढा मागी लावावा, अशी मागणी करण्यात आली आहे



# महाज्योतीतर्फे आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेचे पुरस्कार वितरित






**गोंदिया:–** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूरच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हानिहाय निबंध स्पर्धेचा निकाल १२ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आला. त्या पुरस्काराचे वितरण प्रजासत्ताकदिनी राज्यातील विविध जिल्ह्यात ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

राज्याचे मदत पुर्नवसन व बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते चंद्रपूर येथे, नाशिकचे पालकमंत्री छगन भुजबळ, गोंदियाचे पालकमंत्री अनिल देशमुख, हिंगोलीच्या पालकमंत्री वर्षा गायकवाड, मुंबई शहर पालकमंत्री आदित्य ठाकरे, जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, यवतमाळाचे पालकमंत्री संजय राठोड, परभणीचे पालकमंत्री नवाब मलिक यांच्या हस्ते या निबंध स्पर्धेत जिल्हा स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व धनादेश देवून सम्मानित करण्यात आले. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातून प्रथम क्रमांक अर्जुनी मोरगाव येथील नितेश ईश्वरदास मडावी,व्दितीय क्रमांक धोटे बंधु विज्ञान महाविद्यालय गोंदियाची रोहीणी मौजे व तृतीय क्रमांक एन.एम.डी.महाविद्यालयाची मोनाली सोनटक्के यांचाही समावेश आहे.









**कोविड–१९ काळात उत्कृष्ठ सेवा दिल्याबद्दल सामाजिक न्याय विभागाचे उपायुक्त मंगेश वानखेडे यांचा जिल्ह्याचे पालकमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सम्मान करण्यात आला.**



# किमान दोन शिक्षकांची कोरोना चाचणी करा

**गोंदिया:** इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची शाळा २७ जानेवारीपासून सुरु होत आहे. शाळेत जाण्यापुर्वी प्रत्येक शाळेतील किमान दोन शिक्षकांनी कोविड चाचणी करावी, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप डांगे यांनी दिले आहेत.

शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आरपीटीसीआर चाचणी करुन प्रमाणमत्र शाळा व्यवस्थापनास सादर करतील. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्याची देवाण–घेवाण करु नये, शाळेत विद्यार्थी संख्या अधिक असल्यस दुबार, तिबार पाळीत शाळा भरविण्याचे नियोजन करावे, वर्ग सुरु होण्याच्या व संपण्याच्या वेळामध्ये १० मिनिटांचे अंतर असावे, शाळेत गर्दी टाळण्यासाठी आगमन व गमन यांचे वेळापत्रक निश्चित करावे, शाळेला एकापेक्षा अधिक प्रवेशद्वार असल्यास सर्वांचा वापर करावा, शालेय परिसरात ४ पेक्षा जास्त विद्यार्थी जमा होणार नाहीत याचे नियोजन करावे, पालकांनी शक्यतो विद्यार्थ्यांना स्वत:च्या वैयक्तिक वाहनाने ने–आण करावे, शाळेत अभ्यागतांना येण्यास मनाई करण्यात यावी, परिपाठ, स्नेहसंमेलन, क्रीडा कार्यक्रम आयोजित करण्यावर निर्बंध असावेत. एका वर्गात जास्तीत–जास्त २० ते ३० विद्यार्थी बसण्याची व्यवस्था असावी, अतिरिक्त वर्गखोल्या असल्यास त्यांना स्वच्छ करुन त्यांचा वापर अध्यापनाकरिता करण्यात यावा, एकही विद्यार्थी बाधित होणार नाही याची खबरदारी व काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप डांगे यांनी दिले. कोविड–१९ नियमांच्या अंमलबजावणीची तंतोतंत अंमलबजवणी करण्याच्या हेतूने शिक्षण विभागाने घेतलेल्या बैठकीत ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. सभेला शिक्षणाधिकारी (प्राथ.) राजकुमार हिवारे, शिक्षणाधिकारी (माध्य.) प्रफुल्ल कच्छवे, सहायक कार्यक्रम अधिकारी दिलीप बघेले व जिल्हा समन्वयक बाळकृष्ण बिसेन उपस्थित होते.

**या सूचनांचे कारेकोरपणे पालन करा**



शाळेत हात धुण्यासाठी सुविधा उपलब्ध करणे, थर्मल स्कॅनर, पल्स ऑक्सिमीटर, शाळा वाहतूक सुविधांचे निर्जंतुकीकरण करणे, शाळा व्यवस्थापन समितीची शाळा सुरु होण्यापुर्वी बैठक आयोजित करुन नियोजन करणे, विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यापुर्वी पालकांची संमती लेखी स्वरुपात देणे, आजारी असलेल्या मुलांना शाळेत व पाठविणे, शालेय परिसर व वर्गखोल्या निर्जंतुकीकरण करणे, शाळेत वावरतांना विद्यार्थ्यांनी ६ फुटाच अंतर ठेवावे, वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे बैठक व्यवस्था करणे, स्टाफ रुममधील बैठक व्यवस्था शारीरिक अंतरानुसार असावी. थुंकण्यावरील बंदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे, शाळेच्या दर्शनी भागावर मास्कचा वापर व घ्यावयाची खबरदारी असणारे पोस्टर, स्टिकर प्रदर्शित करणे, अध्यापन करताना लहान–लहान गट तयार करुन शारीरिक अंतर ठेवण्यात यावे, अशा सुचना दिल्या आहेत.

# संगणक प्रणित आंतर राज्य बदली वन वाहतूक पासला सुरुवात

**गोंदिया:** राज्यसरकारच्या धोरणाची अमलबजावणी करीत असतांनाच वेळेची बचत होऊन नागरिकांना त्वरीत शासकीय योजनांचा लाभ आणि इतर सोयी मिळाव्यात यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर सुरु करण्यात आलेला आहे. लोकसेवा हमी कायदा २०१५ नुसार महाराष्ट्र वनविभागाने महाफॉरेस्ट या संकेतस्थळावर नागरिकांसाठी ११ वी सुविधा संगणक प्रणित आंतर राज्य बदली वन वाहतूक पास( ई.टी.पी) उपलब्ध करुन दिली आहे.त्या प्रणालीचा वापर गोंदिया वनपरिक्षेत्र कार्यालयांतगंर्त येथील कोरणी वन उपज तपासणी नाका येथून शुभारंभ करण्यात आला.विभागातील विविध वन उपज,मालकी खसरा प्रकरणातील लाकडे,आंतर राज्य बदली पास,शासकीय वन आगारातील लाकडे निकासी करण्याकरीता वाहतूक परवाना जारी करण्यात येत होते.ही कार्य पद्धत ब्रिटिश काळापासून सुरु आहे.काळानुरूप वाहतूक परवाना मध्ये बदल होणे आवश्यक होते.त्यानुसार संगणकीय प्रणालीचा वापर करीत ईटीपी अमलांत आणण्यात आली आहे.त्या अंतर्गत महाराष्ट्र बाला–घाट सीमेवरील कोरणी तपासणी नाका येथून २२ जानेवारीला गोंदिया ते अनंतपुर(आंध्रप्रदेश) पहिला संगणक प्रणित आंतर राज्य बदली वन वाहतूक पास वनपरिक्षेत्राधिकारी एस. जी. नांदवटे यांनी योगेश काळे यांच्या मार्गदर्शनात भोया नरसिम्हा यांना दिला.



तर यापुवी नागपूर वनवृत्तांतर्गत पहिला संगणकीय ई वाहतुक परवाना(ई–टीपी)गोंदिया वनपरिक्षेत्र कार्यालयांतर्गत किन्ही येथील महिलेला ११ जानेवारी रोजी वितरीत करण्यात आला होता. यापूवी तेंदुपान कंत्राटदार/उत्पादक यांची नोंदणी करणे, बांबू पुरविणेसाठी नवीन बुरड कामगाराची नोंदणी करणे,वन्यप्राण्यांच्या हल्लूयामुळे झालेल्या पशु नुकसानीची नुकसान भरपाई मंजुर करणे,वन्यप्राण्यांच्या हल्लूयामुळे व्यक्ती जखमी किंवा मृत झाल्यास आर्थिक सहाय्य मंजुर करणे,वन्यप्राण्यांच्या हानीमुळे झालेल्या पीक नुकसानीकरीता नुकसान भरपाई मंजुर करणे,वन्यजीव क्षेत्रात पर्यटन हंगामात फोटोग्राफीसाठी परवानगी (वृत्तस्तर), वन्यजीव क्षेत्रात पर्यटन हंगामात फोटोग्राफीसाठी परवानगी (एकापेक्षा अधिक वृत्तांसाठी), आरागिरणी परवान्याचे नुतनीकरण, झाडे तोडण्याकरिता बिगर आदिवासी अर्जदारांना परवानगी,झाडे तोडण्याकरिता आदिवासी अर्जदारांकरिता परवानगी अशा सुविधा नागरिकांना वन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.त्या सर्व सेवा आता संगणकीय प्रणालीत कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. सदर प्रणालीमुळे आता कास्तकार व्यापारी यांना कमी वेळेत कोणत्याही गावातून संगणकामार्फत अर्ज करून विहित फी भरून वाहतूक परवाना प्राप्त होणार आहे. वनविभागाला प्रामुख्याने जंगलातील आणि अवैद्य वृक्षतोडीवर आळा बसण्यासाठी या प्रणालीचा उपयोग होणार आहे.

वनक्षेत्रअधिकारी सुशील नांदवटे, क्षेत्र सहाय्यक एन. पी. वैद्य, वनरक्षक एस. मुंडे, एस. यादव, के. लिल्हारे, आर. नागपूरे, डाटा ऑपरेटर, संगणक तज्ञ आणि वन कर्मचारी यांनी विशेष पर्शिम घेतले. संगणकीय ई परवाना वाहतूक यशस्वी करण्यासाठी सहाय्यक वनसरंक्षक एस. एस. सदगीर, उपवनसंरक्षक कुलराज सिंग, संगणक तज्ञ योगेश काळे, मुख्य वन संरक्षक एस. के. त्रिपाठी, पी. कल्याणकुमार यांचे सहकार्य लाभले.

# खातीटोला येथे १५ लक्ष रुपये किमतीचे ग्रा.प.इमारतीचे लोकार्पण

**तिरोडा** – आपल्याला काम करण्याची धुंदी असली पाहिजे, आत्मसंतोषासाठी कार्य करता आले पाहिजे. भक्त पुंडलिकाने आईबापाची सेवा एकनिष्ठेने केली. त्यावेळी देव वैकुंठातून त्याचेकडे आले नि म्हणाले, पुंडलिका, मी प्रसन्न झालो आहे, माझे दर्शन घे. पुंडलिकाने म्हटले – देवा! ज्या आईबापाच्या सेवेमुळे तुम्हाला येथे यावे लागले ती सेवा तुम्हा देवापेक्षाही श्रेष्ठ आहे, ती मी कशी सोडू अखेर आपली सेवा चालू ठेवूनच त्याने वीट फेकली आणि तिचेवर विठ्ठलाला तिष्ठत उभे राहणे भाग पाडले.

कित्येक वेळा आपण गावाच्या सुधारणेकडे दुर्लक्ष करतो, सार्वजनिक कामांकडे कानाडोळा करतो, व त्यामुळे गावाच विकास थांबतो तेव्हा सर्व नागरिकांनी गावाच्या विकासाकरिता समोर येवून प्रशासनास सहकार्य करण्याचे प्रतिपादन तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी जनतेस केले. खातीटोला येथे जिल्हा वार्षिक योजना २०१९–२० अंतर्गत खातीटोला येथे १५.०० लक्ष रुपये ग्रामपंचायत इमारतीचे लोकार्पणप्रसंगी



ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रामुख्याने भाजप, माजी जी.प.सदस्या सौ. छायाताई दसरे, माजी उपसभापती डॉ.वसंत भगत, माजी प.स.सदस्य प्रकाश पटले,पवन पटले, अर्जुन नागपुरे झालूटोला सरपंच शंकर टेंभरे, उपसरपंच रेखाताई मेश्राम, सुभाष साठवणे, ग्रा.प.सदस्य गेंदलाल चौधरी, राजेशकुमार ठाकरे, भुमेस्व भोयर, सौ. धनवनताताई नेवारे सदस्या, सौ. पुष्पाताई कटरे सदस्या, शमकलाताई चौधरी, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सचिव विवेक विवेक चौधरी,आत्माराम दसरे, प्यारेलालजी चौधरी त.मु.स. झालुटोला/खतीटोला, सौ. लालिताताई नरेंद्र ठाकरे पो. पा. झालुटोला, कु. एस. टी.बीसेन ग्रामेविका, नरेंद्र ठाकरे ग्राम रोजगार सेवक सुरेश चौरीवार परिचर, छत्रपती शहारे विद्युत वाहक, माधुरी बारेवार संगणक परिचालक, भुमेश ठाकरे स्वचक ग्राम पंचायत झालुटोला उपस्थित होते

# मुलीच्य न्यायसाठी करणार पालकमंत्र्यांचा घेराव

**गोंदिया:** माझ्या मुलीचे अपहरण, लैगिंक छळ व हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणाला घेऊन मी प्रजासत्ताकदिनी पालकमंत्री अनिल देशमुख यांचा घेराव करणार आहे. अशी माहिती दुर्वास भोयर यांनी २४ जानेवारी रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



शहरातील मरारटोली रहिवासी दुर्वास भोयर यांची १४ वर्षीय मुलगी १६ जानेवारी रोजी तिरोडा मार्गावरील भागवतटोलाजवळ जखमी व बेशुद्ध अवस्–थेत आढळली. त्यानंतर तिला गोंदिया येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान १७ जानेवारीला सकाळी तिचा मृत्यू झाला. माझ्या मुलीचा खून करण्यात आल्याचा आरोप मुलीच्या वडील व कुटुंबियांनी केला आहे. रामनगर पोलिसांनी याप्रकरणी आरोपींवर अपहरण करुन खुनाचा गुन्हा दाखल केला नाही. आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींवर अपहरण व खूनाचा गुन्हा दाखल करुन त्वरित अटक करावी, रामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षकास निलंबित करण्यात यावे, माझ्या मुलीच्या प्रकरणाची चौकशी सीबीआय व सीआयडीकडून करण्यात यावी, या प्रकरणाला घेऊन प्रजासत्ताकदिनी पालकमंत्री अनिल देशमुख यांचा घेराव करणार आहे, अशी माहिती दुर्वास भोयर यांनी पत्रपरिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला प्रा.बन्सोड, शिव नागपुरे, योगेश रामटे , आदर्श मेश्राम, अतुल सतदेवे, राजू राहूलकर, भांडारकर, महेशनाथ भारती, सुनील भालाधरे, चौरे, ज्योती डोंगरे, सरिता भांडारकर आदि उपस्थित होते.

# सरपंच पदाची गुरुवारी आरक्षण सोडत

**गोंदिया:** जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या १८९ ग्रामपंचायती आणि पुढील काळात रिक्त होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपककुमार मीना यांनी बुधवार २० जानेवारी रोजी संध्याकाळी जाहीर केला. त्यानुसार २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्ह्यातील सर्व आठही तहसील कार्यालयात सरपंचपदाची आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

मागील आठवड्यात पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदाचे आरक्षण राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केले नव्हते. निवडणूक पार पडल्यानंतर सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जिल्ह्यातील ५४४ ग्रामपंचायतींपैकी मुदत संपलेल्या १८९ ग्रामपंचायतीसाठी १५ जानेवारी रोजी निवडणूक घेण्यात आली. सोमवार १८ जानेवारी रोजी निकाल जाहीर झाले. यात १६९३ उमेदवार निवडून आले. मात्र सरपंच पदाचे आरक्षण जाहीर न झाल्याने कोणत्या गटाचा व प्रवर्गाचा उमेदवार सरपंचपदी आरूढ होणार याची उत्सुकता असून गुरुवारी होणाऱ्या आरक्षण सोडतीकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे. बुधवार २० जानेवारी रोजी जिल्हाधिकारी मीना यांनी जिल्ह्यातील सर्व ५४४ ग्राम पंचायतीच्या सरपंच पद आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार ५० टक्के महिलांना सरपंचपदी आरूढ होण्याची संधी प्राप्त झाली आहे. जिल्ह्यातील आठही तहसील कार्यालयात २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सरपंच पदाची आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. त्यामुळे गावच्या प्रथम नागरिकाचा




मान कुणाला प्राप्त होणार याकडे ग्रामवासीयांच्या नजरा लागून आहेत.

**असे राहणार आरक्षण...**

गोंदिया तालुक्यातील ११० ग्रामपंचायती पैकी अनुसूचित जाती १३, अनुसूचित जमाती ११, नामाप्र ३०, खुला प्रवर्ग ५६ तर पन्नास टक्के महिला आरक्षणानुसार अनुसूचित जाती–जमातीसाठी प्रत्येकी सहा पदे, नामाप्र १५, खुला प्रवर्ग १८. तिरोडा तालुक्यातील ९३ पदांपैकी अनुसूचित जाती ११, अनुसूचित जमाती ८, नामाप्र २५, खुला प्रवर्ग ४९. पैकी महिलांसाठी अनुसूचित जाती ५, अनुसूचित जमाती ४, नामाप्र १३, खुला प्रवर्ग २४. गोरेगाव ५६ पदांपैकी अनुसूचित जाती ७, अनुसूचित जमाती ८, नामाप्र १५, खुला प्रवर्ग २६ तर अनुसूचित जाती जमाती महिलांसाठी प्रत्येकी चार पदे नामाप्र ७ आणि खुला प्रवर्गातील महिलांसाठी १३ पदे आरक्षित राहणार आहेत. देवरी तालुक्यातील ५५ पदांपैकी अनुसूचित जाती ६, अनुसूचित जमाती २९, नामाप्र १५, खुला प्रवर्ग ५ पैकी अनुसूचित जाती महिला ३, अनुसूचित जमाती १४, नामाप्र ८ आणि खुला प्रवर्गातील ३ महिलांसाठी पद आरक्षित करण्यात आले आहे. आमगाव तालुक्यात ५७ पदे असून अनुसूचित जाती ५, अनुसूचित जमाती ४, नामाप्र १५, खुला प्रवर्ग ३३ पैकी अनुसूचित जाती महिला ३, अनु. जमाती २, नामाप्र ७, खुला प्रवर्गातील महिलांसाठी १६ पदे. सालेकसा तालुक्यात ४० पदे असून अनुसूचित जाती ३, अनुसूचित जमाती १०, नामाप्र ११, खुला प्रवर्ग १६ पैकी अनुसूचित जाती २, अनुसूचित जमाती ५, नामाप्र ६ आणि खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी ७ पदे राखीव आहेत. अर्जुनी–मोर ७० पदांपैकी अनुसूचित जाती १२, अनुसूचित जमाती १६, नामाप्र १९ तर खुल्या प्रवर्गासाठी २३ पदे असून पैकी अनुसूचित जाती ६, अनुसूचित जमाती ८, नामाप्र ९ व १२ पदे खुला प्रवर्ग महिलांसाठी राखीव आहेत तर सडक–अर्जुनी तालुक्यातील ६३ पदांपैकी अनुसूचित जाती ९, अनुसूचित जमाती १३, नामाप्र १७, खुला २४ पैकी अनुसूचित जाती ४, अनुसूचित जमाती ७, नामाप्र ९ आणि खुला प्रवर्गातील १२ पदे महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहेत.

# जलसंपदामंत्री पाटील ३०,३१ रोजी जिल्ह्यात

**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व जलसंपदा मंत्री जयंत पाटील हे ३० व ३१ जानेवारी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमाला घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे २३ जानेवारीला बैठक घेण्यात आली.




पक्षाचे विस्तारीकरण व आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तथा नगरपंचायतीच्या निवडणुकींना घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व जलसंपदा मंत्री जयंत पाटील खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या शिफारसीवर ३० व ३१ जानेवारी रोजी भंडारा–गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. प्रदेशाध्यक्ष पाटील यांच्या दौरा कार्यक्रमाला घेऊन २३ जानेवारी रोजी रेलटोली येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवनात तालुका पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तसेच क्षेत्रातील सिंचन योजना प्रलंबित असून या योजनेकरिता खासदार प्रफुल्ल पटेल कार्यरत आहेत. या योजनांच्या माध्यमातून जलसंपदा मंत्री पाटील यांचे लक्ष वेधून समस्या मांडण्यात येणार, असे सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष पंचम बिसेन, आमदार मनोहर चंद्रीकापुरे, डॉ. खुशाल बोपचे, विजय शिवणकर, नरेश माहेश्वरी यांनीही मार्गदर्शन केले. बैठकीला गंगाधर परशुरामकर, राजलक्ष्मी तुरकर, किशोर तरोणे, केतन तुरकर, कुंदन कटारे, छोटू पटले, घनश्याम मस्करे, राजू एन. जैन, प्रेमलाल रहांगडाले, केवल बघेले, सी.के. बिसेन, कमलबापू बहेकार, सुरेश हर्षे, सुखराम फुंडे, मनोज डोंगरे उपस्थित होते.